# अध्यात्मवाद :
# श्रद्धा की अंधश्रद्धा?

प्रा. य. ना. वालावलकर

रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**अध्यात्मवाद : श्रद्धा की अंधश्रद्धा?**
प्रा. य. ना. वालावलकर

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखक**
प्रा. य. ना. वालावलकर
बी.१३, सुयोगनगर, सेनापती बापट मार्ग,
पुणे - ४११०१६
मो. नं. : ९४०४६०९१२६

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ ४२०/-

# अनुक्रमणिका

## भाग – १


१. महाकाव्याचा विषय............................................ ७
२. विज्ञानाच्या ऐका हाका.......................................... १०
३. अमूल्य देणगी.................................................. १३
४. भोळ्या श्रद्धाळूंची फसवणूक................................... १५
५. गुरुपुष्यामृत योग................................................ १७
६. चंद्राचा पुष्य नक्षत्रात प्रवेश...................................... २१
७. दोन शंका ...................................................... २४
८. स्वर्ग, मोक्ष आणि गाजरचित्रे.................................. २८
९. आचार्य-गार्गी संवाद........................................... ३१
१०. नामसंकीर्तन साधन पै सोपे।.................................. ३७
११. ब्रह्मजिज्ञासा .................................................. ४१
१२. कोऽ हम? मी कोण आहे?.................................. ४४
१३. गतजन्मीची आठवण ......................................... ४८
१४. पुनर्जन्म ....................................................... ५१
१५. चिंतेची बाब .................................................. ५४
१६. अंधश्रद्धेची परिसीमा .......................................... ५६
१७. वास्तुदिशाभूलशास्त्र .......................................... ५७
१८. धार्मिक उत्सव ................................................ ६१
१९. आयुर्वेदिक सिद्ध घृत ......................................... ६४
२०. मुहूर्ताचे खूळ .................................................. ६९
२१. वृश्चिक राशीची सून .......................................... ७१
२२. शनीची साडेसाती ............................................. ७४

| | | |
|---|---|---|
| २३. | सद्सद्विवेकबुद्धी | ८० |
| २४. | प्रेमविवाह आणि पत्रिका | ८३ |
| २५. | ग्रहज्योतिषाचा उगम | ८६ |
| २६. | बार्नम इफेक्ट | ८९ |
| २७. | बुवा, बाबा, बापूंना आव्हान | ९२ |
| २८. | दिव्य दृष्टी | ९५ |
| २९. | देवाची व्याख्या | ९८ |
| ३०. | हा खेळ बाहुल्यांचा | १०० |
| ३१. | पृथ्वीचा गोल | १०३ |
| ३२. | यात आश्चर्य ते काय? | १०६ |
| ३३. | अभिव्यक्तिस्वातंत्र्य | १०८ |
| ३४. | इलेक्ट्रॉन आणि परमेश्वर | ११० |
| ३५. | काल्पनिक ईश्वर | ११४ |
| ३६. | अपरिमित हानी | ११७ |
| ३७. | धर्म आणि हिंसा | १२० |
| ३८. | नैतिकता | १२३ |
| ३९. | कार्यकारणभाव | १२६ |
| ४०. | दैव जाणिले कुणी? | १२९ |
| ४१. | उदासीन निसर्ग | १३२ |
| ४२. | विवेकवादी लेखनावरील आक्षेप | १३४ |
| ४३. | चक्रीय युक्तिवाद | १३७ |
| ४४. | गूढ, आश्चर्यजनक प्रसंग | १३९ |
| ४५. | सत्य विधान तात्त्विक आणि व्यावहारिक | १४२ |
| ४६. | जळावेगळी मासोळी। तैसा तुका तळमळी। | १४५ |
| ४७. | स्त्रियांची धर्मनिष्ठता | १५० |
| ४८. | पानिपतचा पराभव | १५४ |
| ४९. | विवेकवाद | १५७ |
| ५०. | त्या मोरयाची कृपा! | १६२ |
| ५१. | कर्मफल सिद्धांत | १६६ |

५२. बालपणीचे संस्कार ........................................ १७१
५३. विवेकवाद, अध्यात्म आणि आत्मघात........................ १७४
५४. चित्रगुप्ताची चोपडी ........................................ १७९
५५. देव, धर्म आणि भ्रष्टाचार .................................. १८२
५६. अहंमन्य नास्तिक...?........................................ १८७
५७. मानसिक आधारासाठी ईश्वर.................................. १९०
५८. मेंदू प्रदूषण .................................................. १९४

## भाग – २

१. विज्ञान विचार ................................................ १९९
२. विवेक विचार.................................................. २२३
३. बुवा-बापू विचार............................................... २३०
४. फलज्योतिष विचार............................................ २३८
५. धर्मविचार...................................................... २५७
६. देव विचार..................................................... २८९
७. संकीर्ण विचार.................................................. ३०९

✦✦✦

# लेखकाचे निवेदन

या पुस्तकातील बहुतेक लेख प्रथम 'उपक्रम' या संकेतस्थळावर लिहिले. वाचकांचा प्रतिसाद चांगला लाभला. प्रोत्साहन मिळाले. उत्साह दुणावला. लेखनाविषयी आत्मविश्वास वाढला. लेख पुस्तकरूपात प्रसिद्ध करण्याचे योजले. विज्ञान, विवेक या विषयांशी संबंधित विचारवंतांच्या सुवचनांचा दुसरा भाग जोडला.

या विषयावर मराठीत मोजकेच पण उत्तमोत्तम ग्रंथ उपलब्ध आहेत. डॉ. नरेंद्र दाभोळकर यांचे लेखन तर प्रमाणभूत आहे. त्यांचा 'तिमिरातुनी तेजाकडे' हा अंधश्रद्धा निर्मूलनाविषयीचा परिपूर्ण बीजग्रंथ आहे. तरीसुद्धा त्रोटक स्फुटलेखनाचे हे पुस्तक लिहावेसे वाटले ते काहीतरी सांगण्याच्या ऊर्मीतून. या लेखनात जी टीका दिसते ती भ्रामक समजुती, कालबाह्य रूढी, निरर्थक कर्मकांडे यांवर आहे. श्रद्धावंतांची अवहेलना व्हावी म्हणून नाही. तरीसुद्धा काही जणांच्या भावना दुखावण्याची शक्यता आहे. त्यांची पूर्वलक्षी क्षमा मागतो.

दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने या सुधारित आवृतीत पहिल्या आवृत्तीतील काही लेख गाळले आहेत तर काही नवीन लेख समाविष्ट केले आहेत. ही आवृत्ती 'रिया पब्लिकेशन्स' यांच्याद्वारे प्रकाशित होत आहे. सर्व संबंधितांना मन:पूर्वक धन्यवाद –

**– प्रा. य. ना. वालावलकर**

# १. महाकाव्याचा विषय

आपल्याकडे देवदेवतांची नित्य तसेच नैमित्तिक पूजाअर्चा होते. आरत्या गातात, स्तोत्रे म्हणतात. रामजन्म, कृष्णजन्म साजरे होतात. गणेश चतुर्थी, नवरात्री, शिवरात्री असे अनेक वार्षिक उत्सव होत असतात. साधुसंत, अवतारी मानले गेलेले पुरुष, बुवा, बाबा महाराज यांचेही उत्सवदिन, प्रकटदिन, पालख्या, मिरवणुका असतात.

मानवाच्या प्रगतीत या सर्वांचे काही विशेष योगदान आहे असे वाटत नाही. हे सारे करमणुकीचे, मनोरंजनाचे, सामुदायिक आनंदाचे प्रकार आहेत. तेवढेच त्यांचे महत्त्व.

तसेच ऐतिहासिक राजे, योद्धे, शूरवीर यांचेही वार्षिक स्मरण केले जाते. स्वातंत्र्यसैनिक, क्रांतिवीर, लोकनेते, पुढारी यांच्या स्मरणार्थ कार्यक्रम असतात. पूर्वी होऊन गेलेले नामवंत लेखक, कवी, विविध क्षेत्रांतील कलावंत यांचीही आठवण आपण काढतो. त्यांना आदरांजली वाहतो. त्यांच्याविषयीची कृतज्ञता व्यक्त करतो.

हे सर्व ठीक आहे.

पण ज्यांच्यामुळे मानवाची एवढी आश्चर्यकारक प्रगती झाली, माणसाचे जीवन सुविधापूर्ण आणि सुखकर झाले, ज्यांच्यामुळे कोट्यवधी लोकांचे दु:ख कमी झाले, लक्षावधी लोकांचे प्राण वाचले, वाढत्या लोकसंख्येच्या अन्न, वस्त्र, निवारा आणि आरोग्य या प्राथमिक गरजा बऱ्याच प्रमाणात पुऱ्या होऊ शकण्याच्या यशात ज्यांचा मोठा वाटा आहे, ज्यांच्यामुळे मनोरंजनाची नवनवीन दालने घराघरांत पोहोचली, ज्यांच्यामुळे माणसाचे खऱ्या अर्थाने कल्याण झाले, त्या वैज्ञानिकांचे, त्या संशोधकांचे स्मरण किती जणांना कधी असते?

अखिल मानवजातीवर ज्यांचे अनंत उपकार आहेत, ज्यांचे न फिटणारे ऋण आहे त्या वैज्ञानिकांविषयी कृतज्ञता बाळगणारे अत्यल्पच!

**विचार करा :**

● वाफेच्या इंजिनाचा शोध लागला : बोटी चालू झाल्या, आगगाड्या धावू लागल्या.

● इंटर्नल कंबशन इंजिन शोधले : दुचाकी, चारचाकी स्वयंचलित वाहने पळू लागली. वाहतूक कितीतरी सुलभ, कितीतरी वेगवान झाली.

● विजेचा शोध लागला : यामुळे निर्माण झालेल्या सुविधांची यादी न संपणारी आहे. रात्रीचा अंधार दूर झाला. विजेचा उपयोग सर्वव्यापी आहे. घरगुती सुखसोईंची अनेक साधने विजेवर चालतात.

● पदार्थाचे गुणधर्म शोधले : अणूचे अंतरंग उलगडले, कितीतरी नवनवीन वस्तू, नवनवीन साधने निर्माण झाली.

● सूक्ष्मदर्शक यंत्रातून जंतू पाहिले : अनेक रोगांवर प्रतिबंधक लसी, प्रभावी, परिणामकारक औषधे मिळू लागली. आजवर झालेल्या युद्धांमुळे जेवढी माणसे मृत्युमुखी पडली असतील त्या संख्येच्या कितीतरी पट अधिक माणसे औषधांमुळे वाचली. त्यांचा अकाली मृत्यू टळला.

● वैज्ञानिकांनी अखिल मानवजातीसाठी महान कार्य केले आहे. त्यांचे आपल्यावर अनंत उपकार आहेत. वैज्ञानिकांविषयी आपण कृतज्ञ असले पाहिजे. विज्ञानाला व्यक्तिपूजा मान्य नाही हे खरे; पण आपण वैज्ञानिकांच्या या महान कार्याची जाणीव तरी ठेवायला हवी.

● वैज्ञानिकांविषयी आईनस्टाईन यांनी म्हटले आहे : **''शुद्ध तात्त्विक पातळीवरचे वैज्ञानिक संशोधन करण्यासाठी प्रचंड प्रयत्न, अविरत श्रम आणि त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे संपूर्ण समर्पणाची भावना लागते. संशोधनकार्याला वाहून घ्यावे लागते.**

**अनेक संशोधकांनी निसर्गनियम जाणून घेण्याच्या आंतरिक ओढीने प्रचंड कष्ट उपसले. तहान-भूक विसरून ते संशोधनात गढून राहिले. अशा वेळी जीवनातील उपभोग, मौजमजा, आर्थिक लाभ, प्रसिद्धी असल्या गोष्टींकडे लक्ष नसते. वैज्ञानिकांना तीव्र आच असते ती सत्यशोधनाची. ही खरी तपस्या, ही खरी साधना.**

**अशा उच्चतम ध्येयांच्या साधनेसाठी संशोधकांजवळ असामान्य अंतःस्फूर्ती आणि दुर्दम्य आत्मविश्वास असावा लागतो. प्रयोग करताना वारंवार अपयश येतच असणार; पण निराश न होता, खचून न जाता त्यांनी पुनः पुन्हा अथक प्रयत्न केले असतील याची आपण केवळ कल्पनाच करू शकतो.**''

● विजेचा बल्ब शोधताना एडिसनचे प्रयत्न हजार वेळा विफल ठरले. तो म्हणतो, ''मी कंटाळलो नाही. प्रत्येक अपयशाच्या वेळी नवीन काहीतरी शिकलो.''

● हे सर्व समजू शकणाऱ्या सुशिक्षित लोकांतील बहुतेकांना वैज्ञानिकांविषयी काही कृतज्ञता वाटू नये हे कसे? मानवतेचे खरे उपकारकर्ते वैज्ञानिक आहेत. वेदांतील ऋचा रचणारे ऋषिमुनी नव्हेत. धर्मग्रंथातील वचने लिहिणारे प्रेषित नव्हेत. धर्मगुरू नव्हेत. ओव्या-अभंग लिहिणारे साधुसंत नव्हेत, तर निसर्गनियम शोधून मानवी जीवन सुखी करणारे वैज्ञानिकच आहेत. या वास्तवाची जाणीव का नसावी?

● काल्पनिक देवदेवतांवर स्तुतिस्तोत्रे, आरत्या रचल्या आहेत. शूर पुरुषांवर पोवाडे आहेत, गौरवगीते आहेत. थोर लोकांवर काव्ये, कथा, कादंबऱ्या, नाटके लिहिली आहेत. चित्रपट निर्माण झाले आहेत.

● पण वैज्ञानिकांचा, जगाच्या खऱ्या उपकारकर्त्यांचा गुणगौरव होत नाही. त्यांच्यावर ललित लेखकांनी फार काही लिहिले नाही. जे थोडे काही लिहिले असेल ते लोकांत प्रचलित झालेले दिसत नाही. लोकांना वैज्ञानिकांची महती समजत नाही. योग्य प्रकारे समजावून दिली जात नाही.

● विज्ञानात व्यक्तिपूजा नाही तसेच कोणाची अधिकारवाणीही विज्ञानाला मान्य नाही.

पण विज्ञानाची महती आणि वैज्ञानिकांचे अखिल मानवतेच्या कल्याणाचे कार्य हा खरे तर महाकाव्याचा, महाग्रंथ निर्मितीचा विषय आहे; पण यावर कोणी प्रतिभावंताने सर्वसामान्य लोकांना समजेल, आवडेल अशा भाषेत लिहिल्याचे वाचनात नाही.

✦✦✦

## २. *विज्ञानाच्या ऐका हाका*

नववर्ष २०११ च्या पहिल्या दिवशी (१.१.२०११ ला) दैनिक सकाळ मधील 'अतिथी संपादकीय' डॉ. जयंत नारळीकर यांनी लिहिले. त्या संपादकीयाचे शीर्षक होते, ''विज्ञानाच्या ऐका हाका.''

अत्यंत मन:पूर्वक कळकळीने लिहिलेल्या या संपादकीयाच्या अंतिम परिच्छेदात डॉ. नारळीकरांनी लिहिले आहे.

**''स्वातंत्र्यपूर्व काळात, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा पुरस्कार करताना पं. जवाहरलाल नेहरूंनी एका व्याख्यानात खंत व्यक्त केली होती की, आपला पुराणप्रिय समाज पुष्कळदा योग्य, सारासार विचार न करता परंपरांच्या आहारी जाऊन चुकीचे निर्णय घेतो. आपल्याला स्वातंत्र्य मिळाल्यावर ही प्रवृत्ती, ही रूढीप्रियता कमी होईल, लोक वैज्ञानिक दृष्टिकोनाचा स्वीकार करतील अशी पं. नेहरूंना आशा वाटत होती; पण त्यांचा हा आशावाद फोल ठरला, असे म्हणावे लागेल.''**

याची काही उदाहरणे :

१. पत्रिकेवर श्रद्धा ठेवून लग्न करणे तसेच इतर महत्त्वाचे निर्णय घेणे, ही प्रवृत्ती सुशिक्षित समाजातदेखील वाढते आहे.

२. तथाकथित चमत्कार करून दाखवणाऱ्या बाबा-बुवा-बापू मंडळींमागे अनेक लोक धावताहेत. त्यात काही वैज्ञानिकसुद्धा आहेत.

३. तथाकथित शास्त्रे (!) ज्यांचा खरेपणा सिद्ध झालेला नाही, तो सुशिक्षित समाजावर पगडा ठेवून आहेत.

बहुसंख्य लोकांत वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव आहे ही खंत डॉ. जयंत नारळीकरांनी अनेकदा व्यक्त केली आहे. या संदर्भात लेखनातून आणि भाषणातून जनप्रबोधन केले आहे.

पण पत्रिका, मंगळ, गुणमेलन, एकनाड, अशुभ योग या सर्वस्वी निरर्थक असलेल्या कल्पना माणसाच्या मनात इतक्या दृढ झाल्या आहेत की, त्यावर स्वबुद्धीने काही विचार करणे त्यांना कधी सुचतच नाही.